# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १३४-२३** **दिनांक :- २५/०४/२०२३**

## घरफोडी चोरी करणारा आरोपी १२ तासात अटक करुन गुन्हयाची उकल. गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिरा युनिटची कामगिरी.

----ooooo----

दिनांक २४/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी राजीव ओमप्रकाश मेहरा हे त्यांचे राहते घर बंद करुन, कामानिमीत्त बाहेर गेले असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचा टेरेसचा दरवाजा कापून आतमध्ये प्रवेश करुन, बेडरुम मध्ये असलेल्या कपाटाचा दरवाजा कशानेतरी कापुन, कपाट उघडून, कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम रुपये ७०,००,०००/- व सोन्या-चांदीचे दागिणे असा एकुण ७०,१२,०००/- रुपये किंमतीचा माल लबाडीच्या इरादयाने घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत मिरारोड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १५२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिरा युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे समांतर तपास होते. सदर गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता तपासाचे अनुषगांने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमिरा युनिटचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपी संजीवकुमार सदानंद सिंह, रा. शितलनगर, मिरारोड पूर्व यास निष्पन्न करुन, त्यास दिनांक २५/०४/२०२३ रोजी अटक केली व त्याचेकडून घरफोडी चोरी करुन नेलेली एकूण रुपये ७४,५०,०००/- रोख रक्कम व १२,०००/- रुपये किंमतीचे १) सोन्याची बाली २) चांदीचा कॉईन (नाणे) असा मुददेमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिराचे पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, स.फौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पोहवा/अविनाश गर्जे, संजय

शिंदे, संतोष लांडगे, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, पोशि/प्रशांत विसपुते, सफौ. संतोष चव्हाण/ सायबर शाखा यांनी केली आहे.



----oooo----